जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - २८९ दिनांक - १७/०७/२०२४**

लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर

**लोणीकंद पोलीसांनी गावठी हातभट्टी केली उध्वस्त**

दिनांक १२/०७/२०२४ रोजी लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सावळाराम साळगावकर यांनी पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. निलेश जगदाळे यांचे नेतृत्वाखाली सपोनि गोडसे व त्यांच्या तपास पथकाची एक टिम तयार करुन त्यांना योग्य ते निर्देश देवुन मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने रवाना केले होते. त्यानुसार सपोनि गोडसे व त्यांच्या टिमने त्यांची वाहने एका विशिष्ट अंतरावर लावुन तेथुन सुमारे १ किमी पायी जावुन फुलगाव गावच्या हद्दीत शेतजमिनीलगत भिमा नदी किनारी एका हातभट्टीच्या धंदयावर छापा टाकला. त्यामध्ये त्याने ३५० लिटर दारु जप्त करुन, ३५,००० लिटर रसायन, त्याशिवाय दारु गाळण्याचे लोखंडी बॅरल, ॲल्युमिनिअमचा पाईप, एक गोलाकार मोठी थाळी, एक चाटु, चार प्लॅस्टिकच्या मोकळया टाक्या व चार लोखंडी टाक्या इ साहित्य, एकुण २,३०,०००/- रु किंमतीचा मुद्देमाल जागीच ताब्यात घेवुन नष्ट केला. आणि या अनुषंगाने लोणीकंद पोलीस स्टेशनला दिनांक १३/०७/२०२४ रोजी गु.र.क्र. ६७६/२४ कलम महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (फ) (ब) (क) प्रमाणे अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त श्री. विजयकुमार मगर परिमंडळ ४, पुणे शहर, मा.सहा. पोलीस आयुक्त येरवडा विभाग, पुणे शहर, श्री. विठठल दबडे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर. श्री. सावळाराम साळगावकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. निलेश जगदाळे, तपास पथकाचे सपोनि रविंद्र गोडसे, पोलीस अंमलदार तिकोणे, साळवे, कोकरे, माने, कुंभार, चव्हाण सर्व लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर यांनी केली आहे.